# महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशन

## 50 वी अर्थात सुवर्ण महोत्सवी राज्य ज्यूदो स्पर्धा

**प्रस्तुतकर्ता**

**Punit Balan Group**

नमस्कार,

मागील पाच दिवसात आपल्या महत्वाकांक्षी 50 वी अर्थात सुवर्ण महोत्सवी खुली राज्य ज्यूदो स्पर्धेच्या तयारीसाठी आम्ही तिघे म्हणजे महासचिव शैलेश सर, पहाडे सर आणि दत्ता आफळे नागपूर येथे जाऊन आलो. आमच्याबरोबर नागपूर ज्यूदो संघटनेचे अध्यक्ष श्री चौधरी सर यांनी सर्वश्री उधमसिंग आणि प्रकाश मांडोकार यांना सहकार्यासाठी आमच्यासोबत राहायला सांगितले होते. याच दरम्यान केंद्रीय मंत्री सन्माननीय श्री गडकरी जी यांच्या पुढाकाराने नागपूर शहरात नियमीतपणे आयोजित होत असलेल्या खासदार क्रीडा स्पर्धेसाठी सर्वश्री चौधरी सर आणि नागपूरचे सचिव श्री मुकुंद डांगे हे ज्यूदो स्पर्धेच्या आयोजनासाठी पूर्णवेळ कामात होते आणि त्याचा दृश्य परिणाम ही स्पर्धा अत्यंत यशवी सिद्ध ठरली.

मी आपणा सर्वांना या खासदार क्रीडा स्पर्धेबाबत त्रोटक माहिती देतो. याचे काही फोटो काल आपल्यापर्यंत पोहोचवले आहेतच. या क्रीडा महाकुंभासाठी (स्पर्धेसाठी) नागपूर आणि विदर्भ परिसरातील फक्त ज्यूदोसाठी 600 वर ज्यूदोका सहभागी झाले होते ही बाब निश्चितच ज्यूदो-संघटक म्हणून खूपच आश्वस्त करणारी आहे. व्हिडिओ कॅमेरा आणि स्क्रीन यांसह सर्व आधुनिक साहित्यानी परिपूर्ण या स्पर्धेत वादाची वा मोठ्या अपघाताची कोणतीही अप्रिय घटना घडली नाही हे नागपूर संघटनेचे आणि पर्यायाने श्री चौधरी-डांगे सर आणि त्यांच्या टीमचे श्रेय आहे. महाज्यूदो परिवारातर्फे तोंड भरून करण्यात येत असलेल्या कौतुकास नागपूर ज्यूदो संघटना शंभर टक्के पात्र आहे.

आता खासदार चषकाविषयी थोडेसे. या स्पर्धेत 66,000 (सहासष्ट हजार .... बापरे !) खेळाडूंचा सहभाग होता. सर्व प्रचलित खेळ यात सामील करून घेतले गेले होते. विजयी स्पर्धकांना रोख बक्षिसांसह पदक,

चषक आणि प्रमाणपत्रे देण्यात आली होती. स्पर्धकांच्या भोजनाची सोय आयोजकांकडून करण्यार आली होती. पंचांचे पुरेसे मानधन, खेळ आणि खेळाडूंच्या प्रसिद्धीची सोय याचीही पूर्तता करण्यात आली होती. एकंदरच अत्यंत आदर्श असा हा उपक्रम गेल्या अनेक वर्षांपासून यशस्वीरीत्या श्री गडकरी साहेब यांच्या कार्यालयामार्फत राबवला जातोय हे विशेष.

अशाप्रकारच्या आयोजनाचे इतर जिल्ह्यातील खासदारांनी प्रयत्न केल्यास खासदार निधीचे खेळाडूंसाठी उत्तम, यथार्थ आणि रचनात्मक वापर होवून यामुळे तळागाळातील खेळाडू राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचू शकतील.

आपण आपल्या जिल्ह्यातील खासदारांपर्यंत पोहोचून या उपक्रमाची माहिती देण्याचा प्रयत्न करावा आणि पहावे, असा काही आदर्श उपक्रम सुरू होतोय का ते आपल्या जिल्ह्यात!

पण, हॅट्स ऑफ टू नागपूर ज्यूदो आणि गडकरी साहेब !!

================== ================ =================== ==========

आता आपल्या स्पर्धेविषयी.

नागपूर येथील या भेटीत आपण स्पर्धेसाठी आवश्यक जवळपास सर्वच विषयांवर प्रगती केली आहे.

नागपूर येथे सर्वप्रथम आपले शिष्टमंडळ भाजपाचे प्रदेशाध्यक्ष श्री चन्द्रशेखर बावनकुळे जी यांना भेटून त्यांना स्पर्धेचे आमंत्रण दिले. त्यांनी लगेचच आपल्याला ज्या गोष्टी हव्यात याची विचारणा करून नागपूर जिल्हाधिकारी यांना तातडीने आपल्या स्पर्धेसाठी लागणाऱ्या आवश्यक मदतीच्या सूचना दिल्या.





**निवास व्यवस्थेची** सोय करण्यासाठी केल्या गेलेल्या भेटीमध्ये आपण **मुलींच्या निवासाची सोय** मानकापुर येथील विभागीय क्रीडा संकुल अर्थात स्पर्धास्थानी असलेल्या युथं हॉस्टेल आणि प्रबोधिनी यांच्या दोन्ही इमारतींमधील खोल्यांची निवड केली आहे. तर,

**मुलांच्या निवासाची सोय** राजनगर येथील बांधकाम विभागाच्या मोकळ्या 60 फ्लॅट्समध्ये केलेली आहे.

मुलांचे निवासस्थान आणि मानकापुर येथील विभागीय क्रीडा संकुल अर्थात स्पर्धास्थान हे अंतर पायी चालत जाण्याइतकेच आहे.

निवासासाठी केल्या गेलेल्या सोईमध्ये आपण गादी आणि उशी देणार आहोत.

स्पर्धेवेळी जर थंडीचे वातावरण असेल तर ते पाहून स्पर्धकांना ब्लँकेट पुरवण्यात येतील. **अन्यथा स्पर्धकांनी गादीसाठी एक बेडशीट आणि पांघरण्यासाठी एक चादर आणणे आवश्यक आहे.** या सूचनेची नोंद प्रत्येक जिल्ह्याचे सचिव आणि संघ व्यवस्थापक यांनी गांभिर्याने घेणे आवश्यक आहे.

**<u>भोजन व्यवस्थेची</u>** आपण स्पर्धास्थानीच व्यवस्था केलेली असून आपल्याच परिवरातील एक सदस्य, नागपूर संघटनेचे ब्लॅकबेल्ट प्रशिक्षक आणि राज्याचे पंच श्री मोहन टोंग यांच्याकडे ही जबाबदारी सुपूर्द केलेली आहे.

आपल्याच परिवारातील एक सदस्य त्याच परिवारातील इतर सदस्यांची ज्या आत्मियतेनी काळजी घेईल तशी काळजी मोहनशिवाय इतर कोणीही परका माणूस करणार नाही हा <u>आपला विश्वास आहे</u> आणि हा विश्वास मोहन सार्थ ठरवेल यावर <u>आपल्या सर्वांचा विश्वास आहे</u>.

या विश्वासाचा एक मोठा भाग म्हणजे मोहनने तयार केलेल्या पदार्थांची चव पहाणे. आमच्या समितीने श्री मोहन यांनी तयार केलेले पदार्थ चाखले आणि ती चव चाखून प्रत्येक जण म्हणाला,

व्वाह! कया बात है!

मोहन, आता प्रतीक्षा आहे आपल्या परिवारातील सदस्यांचे तुला प्रमाणपत्र मिळण्याची आणि आम्हाला खात्री आहे की तू वैदर्भिय पदार्थांची चव महाराष्ट्राला चाखायला देवून शाबासकी मिळवशील.

भोजन व्यवस्था चोख होण्यासाठी आपण स्पर्धकांना ओळखपत्र देणार आहोत. या ओळखपत्राशिवाय कोणालाही भोजन व्यवस्थेच्या ठिकाणी प्रवेश दिला जाणार नाही. म्हणून सर्व सहभागी खेळाडू यांच्यासह संघ-व्यवस्थापक, संघ-प्रशिक्षक आणि पंच यांनी स्पर्धेस येताना स्वत:चे दोन पासपोर्ट आकाराचे फोटो आणणे गरजेचे आहे. कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी आणि सर्वांचीच गैरसोय टाळावी.

स्पर्धेचे वेळापत्रक तयार होत आहे. हे वेळापत्रक येत्या दोनेक दिवसात जाहीर केले जाईल म्हणजे त्यासह खेळाडू स्पर्धेसाठी तयार रहातील.

यानंतर आम्ही भेट घेतली ती वनमंत्री आणि चंद्रपुर जिल्ह्याचे पालकमंत्री सन्माननीय श्री सुधीर मुनगंटीवार जी यांची. महासचिव शैलेश टिळक यांच्या फोननंतर त्यांच्या सेक्रेटरीचे उत्तर आले की, साहेबांच्या अत्यंत घाईच्या आणि व्यस्त दिनचर्येतील फक्त पाच मिनिटे आपल्याला मिळतील.

पण जेंव्हा आपल्या महासचिवांनी आपल्या स्पर्धेविषयी आणि संस्थेविषयी माहिती द्यायला सुरुवात केली त्याचा परिणाम असा झाला की आमचा चर्चा-कालावधी पन्नास मिनिटे झाला आणि माननीय वनमंत्री यांनी स्पर्धेला भेट देण्याचे निश्चित करून चंद्रपुर येथील आपल्या संघटनेला मॅट पुरविण्याचे आश्वासन दिले. त्यांनी हेही संगितले की तुमच्या सचिवांनी मला येवून भेटावे. त्यानुसार महासचिव शैलेश टिळक यांनी सर्वश्री कडपेवाले बंधूंना माननीय मंत्री महोदयांची भेट घेऊन वेळ घेण्याची सूचना दिली.

एकंदर, आपल्या स्पर्धेसाठी आताच्या घडीनुसार प्राप्त आश्वासनानुसार उद्घाटनासाठी उपमुख्यमंत्री नामदार श्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, यांसह नामदार बावनकुळे साहेब तर स्पर्धा समापनासाठी केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नामदार श्री गडकरी साहेब येणार आहेत. माननीय श्री मुनगंटीवार साहेब यांच्याबरोबर आपल्याला क्रीडामंत्री नामदार श्री संजय बनसोडे साहेब यांनीही स्पर्धेस उपस्थिती लावण्याचे आश्वासन आवर्जून दिले आहे. दिनांक 04 फेब्रुवारी 2024 रोजी नागपूर येथील एका शासकीय कार्यक्रमासाठी माननीय उपमुख्यमंत्री नामदार श्री अजितदादा येणार असल्याचे कळल्याने आपले अध्यक्ष ॲड. श्री धनंजय भोंसले सेन्से हे श्री अजितदादांच्या उपस्थितीसाठी प्रयत्नशील आहेत.

राज्यातील अशा सर्व राजकीय मान्यवरांना आपण स्पर्धेसाठी आमंत्रित तर करत आहोतच यांसह आपण क्रीडा आयुक्त माननीय डॉ सुहास दिवसे साहेबांची या दोनेक दिवसात भेट घेऊन त्यांना आमंत्रित करणार आहोत.

- स्पर्धेसाठी खेळाडूंनी आपली ज्यूदोगी स्वच्छ आणि नियमाप्रमाणे पुरेशी मोठी असलेलीच आणावी.
- या स्पर्धेसाठी 1045 खेळाडू सहभागी होत आहेत. त्यासाठी आपण एकूण चार मॅट एरिया लावणार आहोत. फेडरेशनचे आजचे अत्याधुनिक सॉफ्टवेअर आपण वापरणार आहोत. खेळाडूंची ही संख्या आजपर्यंतची असलेली मोठी संख्या आहे. त्यामुळे सामन्यावेळी घोषणा झाल्यावर त्या-त्या वजनगटाच्या खेळाडूंनी मॅटपाशी येण्यासाठी तयार राहावे म्हणजे वेळेची बचत होईल.
- स्पर्धेतील खेळाडूंव्यतिरिक्त कोणीही मॅटपाशी येवून चियरिंग करू नये. आपण यासाठी जे स्वयंसेवक शिस्त राखण्यासाठी ठेवणार आहोत त्यांच्याशी हुज्जत न घालता सहकार्य करावे आणि शिस्तीचा बडगा उगारणे टाळावे.
- पदक वितरणावेळी खेळाडूंनी ज्यूदोगी मध्येच आणि नावाची घोषणा झाल्यावर लगेचच यावे. याने आपल्या खेळाची शिस्त आणि देखणेपण पाहुण्यांच्या सामोरे येईल.

या स्पर्धेचे आणखी एक आकर्षण असे आहे की, राज्यातील महिला खेळाडूंचा सहभाग अधिक जोशात आणि उत्साहात व्हावा आणि महिलां-मुलींच्या उपस्थितीची राज्यभर वाढ व्हावी यासाठी महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशन खास “महिला चषक” ठेवण्याची घोषणा करत आहे.
सहभागी सर्व गटातील म्हणजे सबज्युनियर्स-ज्युनियर्स-कॅडेट आणि सिनियर्स जिल्हा संघातील सर्वाधिक पदके जिंकणाऱ्या महिला संघास सांघिक

## “स्वर्गीय मुक्ताताई टिळक स्मृती महिला विजेता चषक”

आणि द्वितीय संघास सांघिक

## “स्वर्गीय मुक्ताताई टिळक स्मृती महिला उपविजेता चषक”

दिला जाईल. या संघाचे प्रायोजकत्व औरंगाबाद जिल्हा (छत्रपती संभाजीनगर) ज्यूदो संघटनेनी स्वीकारले आहे.

ही पन्नासावी प्रतिष्ठित अशी आपल्या प्रिय खेळाची राज्य स्पर्धा आहे. या स्पर्धेतील सहभागी सर्व खेळाडू - प्रशिक्षक - व्यवस्थापक अशा सर्वांनाच महाज्यूदो पदाधिकारी एक भेटवस्तू देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. सर्व पदाधिकारी आणि पंचांसाठी ब्लेझर आणि क्रेस्ट, जे की छातीवर लावण्याचा बॅच आहे तो देखील तयार झाला आहे.




स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी आपल्या संघटनेचे कार्यकर्ते गेले तीन महीने अविरत कष्ट घेताहेत. यामुळे आपला हा सोहळा आपण सर्वांनीच अत्यंत दिमाखदार, देखणा आणि आपल्या खेळाला अभिप्रेत अश्या शिस्तीने आणि आनंदाने साजरा करूया.

**स्पर्धास्थानी शिस्त, शांतता आणि स्वछतेसाठी आपण प्रयत्नशील राहावे ही विनंती आहे.**

शुभेच्छांसह,

कळावे,

विनित,
शैलेश टिळक
महासचिव